वृत्तपत्राचे नांव :– लोकमत

वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :– नाशिक

वृत्तपत्र पान क्र :– 2

दिनांक :–10/02/2011



करवीर पीठाचे दिवंगत शंकराचार्य विद्याशंकरभारती यांची काढण्यात आलेली ग्रामप्रदक्षिणा.

# करवीर पीठाचे दिवंगत शंकराचार्य अनंतात विलीन

**कोल्हापूर, दि.९ (प्रतिनिधी)** – श्री स्वामी जगद्गुरू शंकराचार्य पीठाचे निवृत्त शंकराचार्य श्रीमद् जगद्गुरू श्री. पं. विद्याशंकरभारती आज अनंतात विलीन झाले. ग्रामप्रदक्षिणेनंतर करवीरपीठाच्या शंकराचार्यांसाठीच्या विशेष जागेत शंकराचार्यांना समाधी देण्यात आली.

## ग्रामप्रदक्षिणेनंतर समाधीस्थ

करवीरपीठाचे २५ वे शंकराचार्य विद्याशंकरभारती यांचे काल (मंगळवार) संध्याकाळी ६ वाजून २० मिनिटांनी देहावसान झाले होते. त्यानंतर अहोरात्र विविध पाठशाळांतील वेदमूर्ती सुहासाचार्य, विशालजी वेदाचार्य अनिरूद्धशास्त्री जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विष्णू सहस्रनाम, भगवतगीता रूद्रसुक्त, विष्णूसुक्त आदी शांतिमंत्रांचा उच्चार सुरू होता.

आज सकाळी माधवशास्त्री सोलापूरकर यांच्या पौरौहित्याच्या मार्गदर्शनाखाली स्वामींना देहशुद्धी वैदिक उपचारांतर्गत दूध, दही, मध, तूप पंचगंव्य व जलाभिषेकाने स्नान घालण्यात आले. काषायवस्त्र व भस्म विलेपनानंतर फुलांनी सजविलेल्या वाहनांतून त्यांची ग्रामप्रदक्षिणा काढण्यात आली. नागरिक थांबून महाराजांचे अंत्यदर्शन घेत होते.

मठाच्या आवारातील पीछाडीस असलेल्या बाळेश्वर मंदिराजवळ पूर्वाश्रमींच्या गुरूस्वामींच्या समाधीजवळ मंगलयात्रा झाली.

महापालिकेच्या सहकार्याने तयार केलेल्या समाधीस्थानावर वैदिक मंत्रघोषाने पू.पू.स्वामींना समाधी अवस्थेत आसनस्थ करून मृत्तिका, पुष्पवृष्टी करण्यात आली. समाधिस्थळावर मृत्तिकेचे शिवलिंग तयार करून या समाधी सोहळ्याची सांगता करण्यात आली. पीठाचे उत्तराधिकारी विद्यानृसिंहभारती, मठाचे अध्यक्ष गजानन गणपुले, यांनी समाधी सोहळ्याचे नियोजन केले.